


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६९७. वा | रविवार | दि.०३ मार्च २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# मोदी,शहांसह मंत्रिमंडळातील ३४ जण लोकसभेच्या रिंगणात....

## दोन माजी मुख्यमंत्र्यांना उमेदवारी,सुषमा स्वराज यांची कन्या दिल्लीतून लढणार

**वृत्तसंस्था/ नवी दिल्ली**

लोकसभा निवडणुकीचा रणसंग्राम काही दिवसात जाहीर होणार आहे. त्याआधी सत्ताधारी भाजपने १९५ लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. पहिल्या यादीत १६ राज्य आणि २ केंद्र शासित प्रदेशातील मतदारसंघांचा समावेश आहे. यातील उत्तर प्रदेशमधील सर्वाधिक ५१ उमेदवारांचा समावेश आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्रातील ४८ पैकी एकाही जागेचा पहिल्या यादीत समावेश नाही. नवी दिल्लीत झालेल्या पत्रकार परिषदेत विनोद तावडे यांनी पक्षाची पहिली यादी जाहीर केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे तिसऱ्यांदा वाराणसीमधून तर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे दुसऱ्यांदा गांधीनगरमधून लढणार आहेत. पहिल्या यादीत आसाममधील डिब्रूगड येथून माजी मुख्यमंत्री सर्वानंद सोनोवाल यांना तर मध्य प्रदेशमधील विदिशामधून राज्याचे माजी मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांना उमेदवारी दिली आहे. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांना कोटा येथून उमेदवारी देण्यात आली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांना लखनौ तर अभिनेत्री हेमा मालिनी यांना मथुरेतून उमेदवारी मिळाली आहे.देशाची राजधानी नवी दिल्लीतील ७ पैकी ५ मतदारसंघातील उमेदवारांची यादी आज जाहीर करण्यात आली. चांदनी चौकमधून प्रवीण खंडेलवाल, उत्तर पूर्वी दिल्लीतून मनोज तिवारी, नवी दिल्लीतून माजी परराष्ट्र व्यवहार मंत्री सुषमा स्वराज यांची मुलगी बासुरी स्वराज, पश्चिम दिल्लीतून कमलजीत सहरावत, दक्षिण दिल्लीतून रामवीर सिंह बिधूडी यांना उमेदवारी दिली आहे.लोकसभेच्या दोन जागा असलेल्या गोव्यातील एका म्हणजे उत्तर गोवा मतदारसंघातून श्रीपाद नाईक यांना उमेदवारी दिली आहे. जम्मू काश्मीरमधील उधमपूर येथून डॉ.जितेंद्र सिंह आणि जम्मूमधून जुगल किशोर शर्मा यांना उमेदवारी मिळाली आहे.पहिल्या यादीत केरळमधील १२ उमेदवारांचा समावेश आहे. पत्तनमथिट्टा मतदारसंघातून अनिल के एँटनी यांना उमेदवारी दिली आहे. अनिल हे राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि माजी संरक्षण मंनत्री एके एँटनी



यांचे पुत्र आहेत. काँग्रेसचे विद्यमान खासदार शशी थरूर यांचा मतदारसंघ असलेल्या तिरुवनंतपूरमधून राजीव चंद्रशेखर यांना तर त्रिशूरमधून सुरेश गोपी यांना उमेदवारी दिली आहे. मलप्पुरममधून डॉ. अब्दुल सलाम हे एकमेव मुस्लीम उमेदवार आहेत.मध्य प्रदेशमधील २४ मतदारसंघातील उमेदवार जाहीर झाले आहेत. यात गुना येथून ज्योतिरादित्य शिंदे,विदिशा येथून शिवराज सिंह चौहान, भोपालमधून अलोक शर्मा यांचा समावेश आहे. राजस्थानमधील २५ उमेदवारांमध्ये सीकर येथून स्वामी सुमेधानंद सरस्वती, कोटा येथून ओम बिर्ला या प्रमुख उमेदवारांचा समावेश आहे.

# २७ वर्षीय विवाहितेने इमारतीवरून उडी घेऊन केली आत्महत्या...

## साखरखेर्डा येथील घटना ८ जणांवर गुन्हा...

**जनसंचलन/ साखरखेर्डा**

येथील गीतांजली ले आऊटमधील एका २७ वर्षीय विवाहितेने घराच्या पहिल्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केल्याची घटना १ मार्च रोजी घडली. या प्रकरणी मृत महिलेच्या पतीसह आठ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पतीसह तिघांना अटक करण्यात आली आहे. नरगिसबी शे. शेख सोहेल यांचे पहिले लग्न सोहेल असे मृत महिलेचे नाव आहे. झालेले होते. पहिल्या पत्नीला मूलबाळ होत नसल्याने सोहेलने पहिल्या पत्नीची परवानगीने नरगिसबी सोबत एक वर्षापूर्वी लग्न केले. १ मार्च रोजी दुपारी त्यांनी त्या राहत असलेल्या इमारतीवरून दुपारी खाली उडी मारली. त्यांच्या डोक्याला त्यात गंभीर इजा झाली होती. त्यांना तत्काळ प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. तेथून चिखली येथे हलविण्यात आले, मात्र रामाटरगान यांचा एरा याला या प्रकरणी मृत महिलेचे वडील शेख कुर्शीद शेख बुढन (५६, रा. शेलापूर, ता. मोताळा) यांनी पोलिसात तक्रार दिली. नरगिसबीला माहेराहून पाच लाख रुपये घेऊन ये या कारणावरून शारीरिक व मानसिक त्रास दिला जात असल्याचे तक्रारीत त्यांनी म्हटले आहे. पती शेख सोहेल शेख रब्बीनी व अन्य सात जण हा त्रास देत असल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले होते. यासह अन्य काही बाबींचा उहापोह त्यात करण्यात आला होता. यासोबत नरगिसबीने त्रासाबद्दल मेसेज पाठवला होता. याप्रकरणी दिलेल्या तक्रारीवरून साखरखेर्डा पोलिसांनी पती शेख सोहेल शेख रब्बानी, सासू फरजानाबी शे. रब्बानी, सासरा शेख रब्बानी शेख कालू, दीर शेख आसीम शे. रब्बानी, अर्शीयाबी शे. आसीम, शेख सबीया शे. सोहेल (सर्व रा. साखरखेर्डा) आणि सायराबी शे. हारुन, शे. हारुन चक्कीवाले (दोन्ही रा. सोनाळा) यांच्या निरोधात गुन्हा दाखल केला आहे

# भटक्या कुत्र्यांची नसबंदी खामगाव पालिकेकडून सुरू...

**जनसंचलन/ खामगाव**



शेगाव येथे भटक्या कुत्र्याने लोकमत न्यूज नेटवर्क हल्ला चढवून चिमुकलीला जखमी केल्याचा बोध घेत, खामगाव नगरपालिकेच्यावतीने शहरातील भटक्या कुत्र्यांची नसबंदी केली जात आहे. स्थानिक इंदिरा गांधी म्युनिसिपल हायस्कूलमध्ये ही मोहीम राबविण्यात येत आहे. खामगाव शहरातील विविध वस्तींमध्ये भटके कुत्रे आढळून आल्यास नगरपालिका प्रशासनाला माहिती देण्याचे आवाहन नगर पालिका प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे. यासाठी दोन हेल्पलाइन नंबरही नगरपालिका प्रशासनाने जाहीर केले आहेत. गत काही दिवसांपासून भटक्या कुत्र्यांची नसबंदी होत नसल्याने मोकाट कुत्र्यांचा हैदोस वाढला आहे. जिल्ह्यातील सर्वच शहरात भटक्या कुत्र्यांच्या संख्येत दिवसेंदिवस भर पडत आहे. त्यामुळे शहरवासियांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. दरम्यान, शेगाव येथील घटनेनंतर आता नगरपालिका प्रशासनाने भटक्या कुत्र्यांची नसबंदी मोहीम हाती घेतली आहे. श्वान दंशाच्या वाढत्या घटना पहाता नसबंदीचा निर्णय घेण्यात आला आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# दारू पिऊन तांडव करणारा मुख्याध्यापक निलंबित...

**जनसंचलन/ संग्रामपूर**

शिक्षकांसाठी आयोजित कार्यशाळेला विनापरवाना गैरहजर राहून दहावी, बारावीच्या परीक्षेसाठी असलेल्या परिरक्षक कार्यालयात मद्य प्राशन करून येत येथील कार्यरत शिक्षकांना शिवीगाळ केल्याप्रकरणी मारोड येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक महेंद्र भीमराव रोठे यांना निलंबित करण्यात आले आहे. जिल्हा परिषदचे मुख्य कार्यपालन अधिकारी यांचे आदेशानुसार पंचायत समितीचे गटविकास अधिकारी एम.बी. पायघन यांनी ही निलंबनाची कारवाई केली. २९ फेब्रुवारी रोजी वरवट बकाल येथे तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांसाठी बालरक्षक प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. पण शिक्षक रोठे यांनी या एक दिवशीय प्रशिक्षणाला दांडी मारली. दहावी, बारावीची परीक्षा सुरू असल्याने येथील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये परिरक्षक कार्यालय सुरू करण्यात आले आहे. या रोठे नामक शिक्षकाने या परिरक्षक कार्यालयात येऊन दारूच्या नशेत धिंगाणा घातला उपस्थित शिक्षक कर्मचाऱ्यांना शिवीगाळ केली. शिक्षणाधिकारी यांच्याशी आमने सामने हुज्जत घातली. या सर्व तांडव नृत्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने जिल्हा परिषद प्रशासनाने या शिक्षकाला निलंबित करण्याचे आदेश तात्काळ दिले. यात प्रशासनाची बदनामी होऊन प्रतिमा मलिन झाली आहे. प्रशिक्षणाला दांडी व परिरक्षक कार्यालयात दारू पिऊन धिंगाणा घातला यावरून महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा वर्तणूक नियम १९६७ चे कलम ३ चा भंग केल्याने नियम १९६४ चे कलमनुसार त्यांचेवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनाने तडकाफडकी केलेल्या या कारवाईचे जनतेतून स्वागत होत आहे. निलंबित शिक्षक हे बोडखा शाळेवर असताना त्यांनी सोयीच्या ठिकाणी म्हणजे मारोड गावात प्रतिनियुक्ती करून घेतली होती.

# घरासमोरच महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी चोरली

**जनसंचलन/मेहकर**




कॉलनीमधील एका महिलेच्या गळ्यातील दोन तोळ्यांची सोन्याची साखळी अज्ञात चोरट्यांनी महिला घराचे लोखंडी गेट लावण्यासाठी गेली असता, चोरल्याची घटना २९ मार्च रोजी रात्री दहा वाजेच्या सुमारास घडली. दरम्यान, याप्रकरणी पोलिसांनी पोलिसांनी दोन अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. मेहकरचे माजी नगराध्यक्ष विलासराव चनखोरे यांच्या पत्नी २९ फेब्रुवारी रोजी चनखोरे कॉलनीतील त्यांच्या राहत्या घरात असताना घराचे मुख्य लोखंडी गेट त्यांना उघडले दिसले. त्यामुळे त्या ते गेट लावून घरामध्ये जात असतांना अचानक अज्ञात चोरट्यांनी गेट उघडून त्यांना काही कळायच्या आत त्यांच्या गळ्यातील सुमारे एक लाख दहा हजार रुपयांची सोनसाखळी तोडत दुचाकीवर तेथून पोबारा केला. याप्रकरणी रात्री उशिरा उज्वला जनखोरे यांनी मेहकर पोलिसांत तक्रार दिली आहे. त्यावरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल केल आहे.

# राजे छत्रपती कला महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन संपन्न

**जनसंचलन/बुलडाणा**




राजे छत्रपती कला महाविद्यालय धामणगाव बढे मराठी विभागाच्या वतीने सुप्रसिद्ध मराठी साहित्यिक वि. वा. शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर अविनाश मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी भाषा गौरव दिन संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राध्यापक डॉक्टर नितीन जाधव हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून प्राध्यापक शशिकांत शिरसाट व प्राध्यापक स्वप्निल दांदडे हे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्राध्यापक शशिकांत शिरसाठ बोलताना म्हणाले की, मराठी भाषा ही समृद्ध भाषा असून ही ज्ञानाची भाषा आहे. प्राध्यापक स्वप्निल दांदडे बोलताना म्हणाले की, मराठी भाषा ही पुरातन भाषा असून अभिजीत भाषांचा दर्जा मराठी भाषेला देणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राध्यापक डॉक्टर नितीन जाधव बोलताना म्हणाले की. मराठी भाषेचे मूळ हे सिंधू लिपीच्या पलीकडे जाते ही भाषा समृद्ध असून या भाषेमध्ये अनेक साहित्य निर्माण झाले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक डॉक्टर गोविंद गायकी यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉक्टर गजानन वानखडे यांनी केले.

# मेरा खुर्द येथील राशन दुकानांची चौकशीच्या बाबत जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी लक्ष देण्याची गरज...

**जनसंचलन/बुलडाणा**

मेरा खुर्द येथील राशेन दुकानांची चौकशीच्या बाबत जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी लक्ष देण्याची गरज. चिखली एकनाथ माळेकर चिखली तालुक्यातील मौजे मेरा खुर्द येथील राशेन दुकानदार हे मनमानी करुन थम घेवून वेळोवळी माल देत नाही अशी तक्रार मेरा खुर्द येथील शेख मुख्तार शेख गफआर व इतर यांनी चिखली तालुका पुरवठा अधिकारी चिखली जिल्हा पुरवठा अधिकारी बुलढाणा यांच्याकडे रितसर तक्रार दाखल केली होती. जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी दखल घेऊन मेरा खुर्द येथील राशेन दुकानांची चौकशी करण्यासाठी चिखली तालुका पुरवठा अधिकारी यांना पत्राद्वारे कळविण्यात आले होते परंतु चिखली तालुका पुरवठा अधिकारी यांनी संबंधित तक्रार करते यांना माहिती न देता मेरा खुर्द येथे चौकशी साठी आले होते तक्रार करते शेख मुख्तार शेख गफआर यांना कोणत्याही प्रकारची माहिती देण्यात आली नव्हती. तक्रार करते शेख मुख्तार शेख गफआर हे रोज मंजुरी साठी दररोज बाहेर गावी कामा साठी जातात ज्या दिवशी तालुका पुरवठा अधिकारी यांची टिम गावामध्ये आली त्या दिवशी तक्रार करते घरी नव्हते त्यांना गावातील सरपंच यांनी फोन करून बोलावले होते त्यावेळेस चौकशी समितीच्या टीमने बऱ्याच लोकांच्या सह्या घेतलेल्या होत्या तक्रार करते आले असते त्यांना चौकशी टीमन सहकार्य केले नसल्याचे तक्रार करते शेख मुक्तार यांनी आपल्या तक्रारी मध्ये नमूद केले आहे तसेच ज्या लोकांची तक्रार आहे त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती नव्हती तालुका पुरवठा अधिकारी यांना विचारले असता त्यांनी सदर तक्रारवर मोबाईल नंबर नसल्यामुळे आम्ही तक्रार करते यांच्या पर्यंत पोहोचू शकलो नाही अशी माहिती तालुका पुरवठा अधिकारी चिखली यांनी दिली आहे परंतु आज ग्रामीण भागामध्ये प्रत्येकाकडेच मोबाईल नंबर असेल असे नाही आज ग्रामीण भागामध्ये भरपूर राशेन कार्ड धारक व शेतकरी हे मोबाईल पासून वंचित आहे पुरवठा विभाग महसूल विभाग अंतर्गत येत असल्यामुळे महसूल चे सुद्धा येथे कोतवाल असतात त्यांच्या करवी तरी आम्हाला माहिती पाठवायला पाहिजे होती अशी सुद्धा शेख मुक्तार यांनी बोलताना सांगितले आहे चिखली तालुका पुरवठा अधिकारी यांच्या टीमने २१/०२/२०२४ रोजी मेरा खुर्द येथे चौकशी केली परंतु सदर चौकशी तक्रार करते यांना मान्य नसल्यामुळे माननीय जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी या बाबीकडे लक्ष देऊन मेरा खुर्द येथे चौकशी करण्यात यावी

# मुलाला परीक्षा केंद्रावर सोडायला जाताना वडिलांना हार्ट अटॅक अन् काहीच क्षणात सारं संपलं




**जनसंचलन/बुलढाणा**

सध्याच्या धावपळीच्या जीवनामध्ये हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यू होण्याचे प्रमाण वाढले आहे. बुलढाण्यातील चिखली येथील एका इंजिनिअरिंग व्यावसायिकाचा हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. मुलाला परीक्षा केंद्रावर सोडायला जाताना त्यांना हार्ट अटॅक येऊन त्यांचा मृत्यू झाला. मुलाच्या डोळ्यादेखत वडिलांनी जीव सोडल्याने परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे. आपल्या मुलाला चार चाकी गाडीमध्ये परीक्षेकरता सेंटरवर सोडण्याकरिता घरून निघाले. पण, काहीच क्षणांमध्ये मोठा अनर्थ घडणार आहे याची पुसटची कल्पना त्या दोघांनाही नव्हती. काहीच वेळात वडिलांना मुलाच्या डोळ्यादेखत हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि क्षणात होत्याचं नव्हतं झालं.बुलढाणा जिल्ह्यातील चिखली वेदांत गिट्टी क्रेशर आणि कौशल्या कंक्रट्शनचे संचालक इंजिनिअर प्रमोद बळीराम राजपूत (वय वर्ष ४८) यांचं हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने २७ फेब्रुवारी रोजी निधन झाले. इंजिनिअर प्रमोद राजपूत हे २७ फेब्रुवारी २०२४ ला मुलाला परीक्षेसाठी परीक्षा केंद्रावर घेऊन जात असताना चिखली शहरातील खामगाव चौफुलीजवळ चारचाकी गाडीमध्ये त्रास जाणवला. त्यामुळे त्यांनी रस्त्याच्या कडेला गाडी उभी केली.त्याचदरम्यान त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. बांधकाम क्षेत्रात कार्यरत प्रमोद राजपूत हे धार्मिक प्रवृत्तीचे होते. त्यांच्या अंत्यविधीच्या कार्यक्रमाला परिसरातील राजकीय, सामाजिक, व्यावसायिक, क्षेत्रातील नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. त्यांच्या पश्चात आई-वडील, दोन बहिणी, भाऊ, एक मुलगी, मुलगा आणि बराच मोठा आप्तपरिवार आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# तहसीलदार जैस्वाल यांनी २६५ निराधाराचे प्रकरण केले मंजूर

## कर्ता पुरुष मयत झाल्याने अकरा विधवांना प्रत्येकी २० हजाराची मदत...

जनसंचलन/ सिंदखेडराजा



सिंदखेड राजाचे कर्तव्यदक्ष तहसीलदार सचिन जैस्वाल यांनी संजय गांधी निराधार योजनेचे २६५ प्रकरणे मंजूर करून शेवटच्या माणसाला न्याय देण्याचे काम केले याच सोबत घरातील कर्ता पुरुष मयत झाल्याने तालुक्यातील ११ विधवा पत्नीला प्रत्येकी वीस हजार रुपयाची अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले त्यामुळे निराधार गरीब लोकांना अर्थसाह्य मिळाल्यामुळे त्यांच्या संसाराला थोडाफार तहसीलदार जयस्वाल यांच्यामुळे हातभार लागला आहे ज्यांना कोणी वाली नाही जे खरोखर पात्र लाभार्थी आहेत मात्र काही कागदपत्र पुरावे त्यांना मिळत नसल्याने अशा पात्र लाभार्थ्यांना पगार सुरू न झाल्यामुळे अश्या निराधार लाभार्थ्यांना तहसील कार्यालय मध्ये चकरा मारावे लागतात मात्र तहसीलदार सचिन जयस्वाल यांनी पात्र लाभार्थ्यांना तात्काळ अनुदान मिळावे यासाठी स्वतः कॅम्प लावून पात्र संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांची प्रकरणे ऑन द स्पॉट मंजूर केले निराधारांना पगार सुरू झाल्यामुळे पात्र गोरगरीब निराधार लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर हसू फुटले सिंदखेड राजा चे तहसीलदार सचिन जैस्वाल यांनी आज संजय गांधी निराधार योजना श्रावण बाळ योजना वृद्धापकाळ योजना अपंग निराधार परितक्त्या रोगी घटस्फोटीत आदी २६५ लाभार्थ्यांचे प्रकरण मंजूर केले त्यामुळे निराधारांच्या चेहऱ्यावर आनंदाचे अश्रू तळले दरम्यान तहसीलदार सचिन जयस्वाल यांनी कोणताही पात्र लाभार्थी अनुदानापासून वंचित राहणार नाही त्यांची काय कागदपत्रे कमी असली तर त्यांनी थेट माझे संपर्क साधावा असे आवाहन केले

सदर प्रकरण मंजूर करताना प्रभारी नायब तहसीलदार सुनिता रोकडे महसूल सहाय्यक के डी इंगोले वर्षा पडघान बंडू नवगिरे दत्तू बनकर आदींनी सहकार्य केले

# पिकाला पाणी देऊन घरी परतणाऱ्या शेतकऱ्याचा अपघातात मृत्यू...

जनसंचलन/मेहकर




स्वतःच्या शेतातील पिकास पाणी देऊन घरी परतणाऱ्या शेतकऱ्यास मॅक्झिमो वाहन क्रमांक एम एच -१९. आर जे- ९५४६ चालकाने निष्काळजीपणे वाहन चालवून शेतकरी चरणदास संपत गवई यांच्या दुचाकी क्रमांक एम एच-१५ बिग एस-७७८९ ला जबर धडक दिल्याने शेतकरी चरणदास गवई वय ६४ वर्ष रा. जानेफळ यांचा घटनास्थळावरच मृत्यू झाल्याची घटना शेगाव - पंढरपूर पालखी मार्गावर गोमेधर नजीक अकॅडमीक इंग्लीश स्कुल गोमेधर समोर २८ फेब्रुवारी संध्याकाळी सात वाजेदरम्यान घडली. अपघात झाल्यानंतर मॅक्झिमो वाहनाचा चालक घटनास्थळावरून फरार झाला आहे. याप्रकरणी जानेफळ पोलीस स्टेशनला मॅक्झिमो वाहनाच्या अज्ञात चालकविरुद्ध मृतकाचे भाऊ वसंत विक्रम गवई यांच्या फिर्यादीवरून कलम ३०४ (अ) २७९ कलम १३४,१८४ भांदवि नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेतकरी चरणदास गवई यांच्या अपघाती मृत्यूमुळे जानेफळ सह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणाचा अधिक तपास जानेफळ पोलीस ठाणेदार आदिनाथ मोरे, सफौ भगवान शिंदे पोहेकॉं कैलास चतरकर पोकॉं शेळके हे करीत आहेत.

# महिलांचे आर्थिक सक्षमीकरण हेच ध्येय खामगावातील महिला मेळाव्यात संदीप शेळकेंचे प्रतिपादन

## महिलांच्या चौफेर प्रगतीसाठी जाहीर केला जाहीरनामा...

जनसंचलन/खामगाव

राज्यकर्ते व आजवरच्या लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे बुलडाणा जिल्ह्याचा विकास खुंटला आहे. याला बुलडाणा मतदारसंघातील लाखो माता भगिनीसुद्धा अपवाद नाही.यामुळे जिल्ह्याच्या सर्वकश विकासाबरोबरच महिलांचे आर्थिक सक्षमीकरण हेच आपले ध्येय असल्याचे आग्रही प्रतिपादन वन बुलडाणा मिशनचे संस्थापक तथा शाहू परिवाराचे अध्यक्ष संदीप शेळके यांनी केले. खामगाव येथे शुक्रवारी पार पडलेल्या व उत्साही प्रतिसाद लाभलेल्या महिला मेळाव्यात संदीप शेळके बोलत होते. यावेळी बोलतांना त्यांनी जिल्ह्यातील निष्क्रिय लोकप्रतनिधीवर टिकेचा आसूड उगारतानाच सर्व सामान्य महिलांना सक्षम व स्वावलंबी करण्यासाठी नेमके काय करायला हवे आणि आपण काय करणार हे उलगडून सांगितले. सुवर्ण महोत्सवी वर्षातही जिल्ह्यातील महिलांचे शिक्षण, आरोग्य, रोजगार आदी अनेक प्रश्न कायम आहेत. समाजातील या महत्वाच्या घटकासाठी राजर्षी शाहू परिवाराने अनेक योजना राबविल्या. आजवरच्या काळात महिला बचत गटांच्या ४० हजार महिलांना १५० कोटींचे कर्ज उपलब्ध करून दिले. यामधून अनेक उद्योजक महिला घडल्या आहेत. त्यांच्या मालाला व उत्पादनाला योग्य बाजारपेठ मिळून देण्यासाठी आपण कॉमन फॅसिलिटी सेंटर सुरू केल्याचे त्यांनी सांगितले. महिला व्यवहाराबाबत पुरुषांच्या तुलनेत आधिक चोख असतात. त्यामुळे खासदार म्हणून निवडून दिल्यास महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणावर आपला भर राहणार असल्याचे ते म्हणाले.




माता भगिनींच्या आशीर्वादाने आपण खासदार झालो तर महिलांसाठी आपण विविध योजना उपक्रम राबविणार आहोत, असे संदीप शेळके यांनी स्पष्ट केले. महिलांवरील वाढते अत्याचार लक्षात घेता आपण महीलांसाठी महिला सुरक्षा हेल्पलाईन कार्यान्वित करणार आहोत. त्यामुळे संकटातील महिलांना तात्काळ पोलिसांची मदत मिळेल. जिजाऊंच्या नावाने महिला बचत गटांसाठी ऑनलाइन बाजारपेठ उभारण्याच्या आपला संकल्प आहे. माझ्या अनेक बहिणी जिल्ह्यातील युवती बुद्धीवान असूनही उच्च शिक्षण, आवडीचे शिक्षण, घेऊ शकत नाही. त्यामुळे सिंदखेड राजा येथे राजमाता जिजाऊ विद्यापीठ सुरू करण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत. याशिवाय एमपीएससी, यूपीएससी व अन्य स्पर्धा परीक्षा देण्यासाठी इच्छुक युवतींसाठी तालुक्याच्या ठिकाणी मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र उभारण्याचा मानस संदीप शेळके यांनी यावेळी बोलून दाखविला. उच्च शिक्षण व नोकरीसाठी महानगरात गेलेल्या जिल्ह्यातील युवती व महिलांसाठी सुसज्ज हॉस्टेल उभारण्याचे आपले नियोजन आहे. महिलांच्या वैद्यकीय समस्याच्या प्रश्न सोडविण्यासाठी महिन्यात गावोगावी जाईल. असे आपले नियोजन राहणार आहे.याशिवाय विधवा, मजूर महिलांचे सर्वेक्षण करून त्यांना स्मार्ट कार्ड देणार आहोत. यातून त्यांना विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत. यामुळे माताभगिनींनी आपल्या या स्वप्नांची पूर्तता करण्यासाठी येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत पाठबळ देण्याचे आवाहन संदीप शेळके यांनी यावेळी केले.महिला मेळावा झाल्यानंतर संदीप शेळके यांनी खामगाव शहरातील विविध चौकात कॉर्नर मीटिंग घेतल्या. गांधी चौक, मस्तान चौक, जय भवानी चौक, चांदमारी चौक, टॉवर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, फरशी चौक, महेबूब नगर, शंकर नगर, बाळापूर फैल या भागात जाऊन संदीप शेळके यांनी स्थानिकांशी संवाद साधला. यावेळी स्थानिकांनी त्यांच्या अडचणींचा पाढा संदीप शेळके यांच्यासमोर मांडला. संदीप शेळके यांनी स्थानिकांच्या समस्या ऐकून घेत त्या मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करू असा शब्द दिला..!

# नव्या पोलिस अधीक्षक कार्यालयाचे लोखंडी गेट चोरले; एकास अटक...

जनसंचलन/बुलढाणा

चिखली रोडवरील नव्या पोलिस अधीक्षक कार्यालयाचे मुख्य लोखंडी गेट चोरल्याप्रकरणी बुलढाणा शहर पोलिस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नियंत्रण कक्षात असलेला पोलिस कर्मचारी पोलिस कवायत मैदानावर जात असताना त्यांच्या ही बाब निदर्शनास आल्यानंतर त्यांनी शहर पोलिसांत तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी हा गुन्हा दाखल केला आहे. शुक्रवारी पहाटे सात वाजेच्या सुमारास पोलिस नियंत्रण कक्षात कार्यरत असलेले पोलिस कर्मचारी सुनील प्रल्हाद जाधव (५३) हे पोलिस कवायत मैदानात जात असताना अकबरशहा गुलाबशहा (रा. मिर्झा नगर, डोंगरे शाळाजवळ), करड्या उर्फ शाम गौर (रा. सावित्रीबाई फुले नगर), अनुराग हिवाळे (रा, सावित्रीबाई फुलेनगर, सर्व रा. बुलढाणा) हे एका सायकल रिक्षातून नव्या पोलिस अधीक्षक कार्यालयाचे मुख्य लोखंडी गेट घेऊन जात असल्याचे निदर्शनास आले. या गेटची किंमत सात हजार रुपये होती. सुनील जाधव यांना संशय आल्याने त्यांनी संबंधितांना हटकले असता करड्या उर्फ शाम गौर आणि अनुराग हिवाळे या दोघांनी तेथून पलायन केले. प्रकरणी सायकल रिक्षामध्ये



असलेल्या अकबरशहा गुलाबशहा यास विचारपूस करत सुनील जाधव यांनी बुलढाणा शहर पोलिस ठाण्यात नेले. प्रकरणी पोलिस अधीक्षक कार्यालयाचे लोखंडी गेट चोरल्याप्रकरणी पोलिसांनी जाधव यांच्या तक्रारीवरून तिघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास बुलढाणा शहर पोलिस करीत आहेत.

# मारहाण केलेल्या त्या कृत्याचा कोणताच पश्चाताप नाही लोकप्रतिनिधी असलो तरी लोकांची सुरक्षा अधिक महत्वाची-आ.संजय गायकवाड

## पत्रकार परिषदमध्ये आ.गायकवाड यांनी मांडली आपली भूमिका

जनसंचलन/बुलढाणा

शिवजयंतीच्या दिवशी आमदार संजय गायकवाड यांनी एका युवकावर केलेल्या अमानुषपणे केलेल्या मारहाणीचा व्हिडिओ समाज माध्यमांमध्ये व्हायरल झाला होता. त्यावर विरोधकांकडून तीव्र प्रतिक्रिया आल्यानंतर त्यादिवशी नेमकं काय घडलं होतं? हे सांगण्याकरता आज बुलढाण्यात आमदार संजय गायकवाड यांनी आपली पत्रकार परिषद घेतली. आमदार संजय गायकवाड म्हणाले की, शिवजयंती मिरवणुकीमध्ये काही मुलं नशेमध्ये होते. त्यांनी गांजा ओढला होता. ते मिरवणुकीत वावरत असताना त्यांच्या हातात शस्त्र देखील होते. काही महिलांनी माझ्याकडे या तरुणांबद्दल तक्रार केल्यानंतर मी त्या तरुणांचा पाठलाग करत असताना त्या टोळक्यांनी माझ्या अंगरक्षकावर हल्ला केला. माझ्या अंगरक्षकावर हल्ला करत त्यांना खाली पाडले, हे त्या व्हिडिओमध्ये दिसत आहे. त्यानंतर परिस्थिती हाताळण्याकरता त्या तरुणांना माझ्या हातून मारहाण करावी लागली. कारण, ३० ते ४० हजार लोकांच्या गर्दीमध्ये महिला देखील होत्या. मी त्या युवकाला मारहाण केली, त्या कृत्याचा मला जराही पश्चाताप नाही असंही गायकवाड म्हणाले.शिवजजयंती आयोजन समितीमध्ये मी अध्यश असल्याने या विश्वासाने त्या महिला सहभागी झाल्या होत्या. त्यांची सुरक्षा करणे माझं प्रथम कर्तव्य होतं. काही जणांनी मला तिथे प्रशासन असताना आपण कायदा हातात का घेतला? असा सवाल देखील केला. यावर गायकवाड म्हणाले की, मी पोलिसांची वाट पाहत असतो आणि किंबहुना पोलीस प्रशासन हा प्रकार नियंत्रणात ठेवू शकले असते तर गावामध्ये गांजा आणि अवैध टोळके तयार झाले नसते. त्यामुळे यापुढे देखील अशी परिस्थिती



निर्माण झाल्यास मला आधी तिथली सुरक्षा महत्वाची आहे, असंही संजय गायकवाड म्हणाले.काही दिवसांपूर्वी संजय गायकवाडांनी वक्तव्य केलं होतं की, मी एका वाघाची शिकार केली होती आणि त्याचा दात माझ्या गळ्यामध्ये बांधला आहे. याबाबत देखील त्यांनी उत्तर दिलं. ते म्हणाले की, हे सर्व काही खरं नाही. तसेच ज्या महिलेने शेती बळकावल्याच्या प्रकरणी तक्रार केली होती, त्याच्याशी माझा कोणताही संबंध नाही. तो देखील विषय संपला आहे. त्यामुळे आता सगळे विषय संपले आहे, असं देखील संजय गायकवाडांनी यावेळी स्पष्ट केलं आहे.

# मोकाट कुत्र्यांचा चिमुकलीवर हल्ला...

जनसंचलन/ शेगाव

मोकाट कुत्रे किंवा जनावरे यांचा हैदोस जीवावर बेतल्याच्या घटना अनेक वेळा समोर येतात. त्यावर कारवाई केल्यानंतर पुन्हा जैसे थे परिस्थिती होते, पण कायमस्वरूपी यावर संबंधित प्रशासन तोडगा मात्र काढत नाही. अनेक वेळा मॉर्निंग वॉक करणारे किंवा घरासमोर लहान मुलं मुले खेळत असताना मोकाट कुत्र्यांनी त्यांच्यावर हल्ले झाल्याच्या घटना ऐकत असतो. दरम्यान बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे भर दुपारी एक आठ वर्षीय चिमुकली आपल्या घरासमोर खेळत असताना दुर्दैवी घटना घडली आहे.बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव शहरात मोकाट कुत्र्यांचा हैदोस दिवसेंदिवस वाढत आहे. अनेक लोकांवर कुत्र्यांच्या झुंडीने हल्ला चढवून जखमी केले. बुधवारी सायंकाळी रित कन्हैयालाल चौधरी या आठ वर्षीय बालिकेवर चार ते पाच मोकाट कुत्र्यांनी हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना धानुका कंम्पाऊंडमध्ये घडली.



बालिका रित आपल्या आजीसोबत घरासमोरील रोडवर फिरत असताना अचानकपणे चार ते पाच भटक्या कुत्र्यांनी हल्ला चढविला. तिला १० फुटापर्यंत फरफटत नेले.यावेळी कुत्र्यांनी बालिकेच्या डोक्यावरील केस उखडले. नागरिकांच्या सर्तकतेमुळे मुलीचे प्राण वाचले. जखमी अवस्थेत बालिकेस प्रथम खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. ती गंभीर जखमी असल्याने पुढील उपचारार्थ अकोला येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. गुरुवारी दुपारी २ वाजता बालिकेवर शस्त्रक्रिया करण्याचे कार्य सुरू होते. या घटनेनंतर शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे.

# बसच्या धडकेत महिला जखमी...

जनसंचलन/ खामगाव

बसच्या धडकेत पादचारी महिला जखमी झाली. ही घटना शुक्रवारी सायंकाळी स्थानिक बाळापूर फैलात घडली. तक्रारीनुसार, हिरा नगरातील उषा बोराडे या शुक्रवारी रस्त्याने पायी असतांना एसटी क्रमांक एमएच-४०, एएन-८२९० चा चालक अंकुश राऊत याने वाहन निष्काळजीपणे चालवून महिलेला




जखमी केले. चालकाने वाहन चालविताना मद्यपान केले असल्याचेही जखमी महिलेने तक्रारीत नमूद केले. चालकाची वैद्यकीय तपासणी झाली.

# खडकपूर्णा प्रकल्पातून रेतीवाले पुन्हा जोमात तर महसूल विभाग साखर झोपेत संतोष भुतेकर पुन्हा एका नव्या आंदोलनाच्या पवित्र्यात..

जनसंचलन/ चिखली

देऊळगाव राजा तालुक्यातील खडकपूर्णा प्रकल्पातून बोटीद्वारे होणारा अवैध रेती उपसा त्या संदर्भात होणारी आंदोलने आरोप प्रत्यारोप अनेक दिवसापासून सातत्याने सुरू आहे खडकपूर्णा जलाशयातील या अवैध रेती संदर्भात त्यामुळे ग्रामीण भागातल्या रस्त्यांच्या होणाऱ्या विचित्र अवस्थेबाबत या अगोदर अनेकदा संतोष भुतेकर यांनी वेगवेगळ्या अभिनव आंदोलनाच्या माध्यमातून आवाज उठवत अधिकाऱ्यांना कारवाई करण्यास भाग पाडले एकदा हिरवी झेंडी दाखवली एकदा चहापाणी झाला एकदा पाणी कुठे मुरतय म्हणून शाब्दिक फटकरे मारत संतोष भुतेकर यांनी आगदी खालच्या भाषेत महसूल प्रशासनाचे वाभाडे काढले एवढ्यावरच न थांबता जबाबदार अधिकाऱ्यांच्या अनेक पोस्ट सुद्धा व्हायरल केल्या एवढ्याने भागत नाही म्हणून मंत्रालयात आत्मदहनाचा इशारा सुद्धा दिला इशारा दिल्यानंतर संतोष भुतेकर यांना प्रशासनाने ताब्यात घेऊन त्यांना लेखी स्वरूपात आश्वासन दिले व कारवाई सुद्धा केली सतत कारवाई करत राहू असे लेखी आश्वासन दिले कुठल्याही मार्गाने रेती आम्ही खडकपूर्णा प्रकल्पातून चालू होऊ देणार नाही असे लेखी ठोस आश्वासन महसुल विभागाने दिल्यानंतर संतोष भुतेकर यांनी आपले आंदोलन मागे घेतले त्यावेळेस काही बोटी सुद्धा महसुल अधिकाऱ्यांनी फोडल्या सर्वसामान्य लोकांना अपेक्षा होती की आता यांच्यानंतर खडकपूर्णा प्रकल्पातुन बोटीद्वारे अवैध रेती उपसा होणार नाही परंतु रेती माफिया मात्र थांबायचे नाव घेत नाही आता पुन्हा धरणात बोटी द्वारे रेती उपसा हा जोमात चालू झाला असून रोडने गाड्या सुद्धा भरदाव वेगाने वाहने पुन्हा चालू झाले आहे उघड आणि सर्रासपणे धरणात चालणाऱ्या बोटीकडे महसुल अधिकारी सुद्धा डोकावून सुद्धा पाहत नाही कारवाईचा विचारही डोक्यात आणत नाही मंग



या अगोदर आंदोलनानंतर झालेली कारवाई ही अधिकाऱ्यांना ना इलाजाने करावी लागली की काय असाही प्रश्न या निमित्ताने उपस्थित होते भुतेकर हे अधिकाऱ्यांना फोन द्वारे किंवा प्रत्यक्ष भेटून दिलेल्या आश्वासनाची पूर्तता होत नसले बाबत अधिकाऱ्यांना स्मरण देत आहेत परंतु अधिकारी मात्र कुठलाही प्रतिसाद संतोष भुतेकर यांना देत नसल्याने संतोष भुतेकर पुन्हा एकदा आक्रमक आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत

बुलढाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरूण रोड, बुलढाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार

डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)